# भा.कृ.अनु.प.–केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर

## कापसाच्या लागवडीसाठी ४ जानेवारी ते १० जानेवारी २०१६ या कालावधीसाठी आठवडी सल्ला

''हा सल्ला राज्यातील कृषी विद्यापीठाकडून प्राप्त माहितीवर आधारित आहे''

### हवामानासंबंधी सल्ला

| राज्य/जिल्हा | **सल्ला — ४ जानेवारी ते १० जानेवारी २०१६** |
|---|---|
| **महाराष्ट्र** | |
| नागपूर<br>वर्धा<br>चंद्रपूर<br>यवतमाळ<br>अमरावती<br>अकोला<br>बुलढाणा<br>परभणी<br>नांदेड<br>बीड<br>वाशिम<br>धुळे<br>जळगांव<br>जालना<br>औरंगाबाद | कापूस पीक सध्या वाढीच्या शेवटच्या टप्यात आहे. ज्या ठिकाणी मागील पीक एप्रिल/मार्च पर्यंत ठेवण्यात आले होते अशा बीजी, बीजी–II आणि गैर बीटी कापसामध्ये हिरव्या बोंडचा प्रार्दुभाव दिसून आला आहे. ज्या ठिकाणी २०% पेक्षा जास्त प्रार्दुभाव प्रति २० हिरवे बोंड अशा ठिकाणी पायरेथ्राईडची एक फवारणी करावी ज्यामुळे राहिलेले हिरव्या बोंडाना अळीचा प्रार्दुभाव होणार नाही. शेतकऱ्यांना सल्ला दिला जाता कि, ८–१० हिरव्या बोंडासाठी एक फवारणी करावी ज्यामुळे गुलाबी बोंडअळीला नियंत्रण करण्यास उपयोग होईल. किटकनाशकाचा वापर कापसाच्या वेचणीनंतर हिरव्या बोंडाना वाचविण्यासाठी करावा. शेतकऱ्यांना सल्ला दिला जातो कि त्यांनी जानेवारी महिन्यापर्यंत पीक काढून टाकावे. पिकांना खत व पाणी देवून पिकाचा कालावधी वाढवू नये कारण उशीरा आलेल्या बोंडांना गुलाबी बोंडअळीचा प्रार्दुभाव वाढू शकतो. उन्हाळयात तसेच कापसाचा खेडवा घेणे टाळावे. त्यामुळे गुलाबी बोंडअळी व बोंडअळीमध्ये प्रतिकारक्षमता वाढणार नाही कापसाची वेचणी सकाळी १० वाजता करावी तसेच अगोदर वेचणी झालेला कापूस स्वच्छ पिशवीमध्ये साठवून ठेवावा. कापसाला योग्य भाव मिळण्यासाठी त्याची स्वच्छ वेचणी करावी. वेचणी ताबडतोब करून घ्यावी. पिकांची अदलाबदल करावी. ज्यामुळे किटक, रोग, तणांच्या वाढीवर नियंत्रण येऊ शकेल. कापसाची स्वच्छ बियाणे स्वच्छ पिशवीमध्ये साठवून ठेवावे. कुठल्याही प्रकारचे किडरहित बियाणे साठवून ठेवू नये. कापसाचे जुने बियाणे गुलाबी बोंडअळीहसाठी कारणीभूत करू शकते. जर बियाणे किडरहित असेल तर ते ताबडतोब नष्ट करावे. कापसाच्या बियाण्यांची योग्य ती तपासणी करूनच ते साठवून ठेवावे. कापसाचे देठ त इतर भागाचा वापर त्याचा कंपोस्ट खत म्हणून करावा व ते जाळू नये. |